**कृपया प्रसिध्दीसाठी** **4 डिसेंबर 2012**

## इंटरनॅशनल लेप्रसी युनियनचे राम नाईक अध्यक्ष, तर चंद्रशेखर धर्माधिकारी मार्गदर्शक

**मुंबई, मंगळवार :** कुष्ठपीडितांसाठी आंतरराष्ट्रीय कीर्तिचे काम करणा-या इंटरनॅशनल लेप्रसी युनियनच्या अध्यक्षपदी माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्याचप्रमाणे माजी न्यायमूर्ति श्री.चंद्रशेखर धर्माधिकारी यांना संस्थेने 'मार्गदर्शक' (पेट्रन) म्हणून सन्मान दिला आहे. इंटरनॅशनल लेप्रसी युनियनने प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात ही माहिती देण्यात आली आहे.

इंटरनॅशनल लेप्रसी युनियनच्या नुकत्याच पुणे येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये ही निवड करण्यात आली. देशभरातील कुष्ठपीडितांसाठी काम करणा-या संस्थांना बरोबर घेऊन कुष्ठपीडितांच्या सक्षमीकरणासाठी श्री.राम नाईक करीत असलेले प्रयत्न सर्वश्रुत आहेत. त्यामुळेच गेल्या वर्षी इंटरनॅशनल लेप्रसी युनियनने कुष्ठपीडितांच्या मानवी हक्क संरक्षणासाठी नेमलेल्या राष्ट्रीय समितीचे अध्यक्षपद श्री.राम नाईक यांना दिले होते. त्यानंतर आता श्री.नाईक यांच्या मार्गदर्शनाचा कुष्ठपीडितांना सातत्याने लाभ मिळावा यासाठी त्यांची संस्थेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. डॉ.शरद्चंद्र गोखले इंटरनॅशनल लेप्रसी युनियनचे मानद अध्यक्ष आहेत.

दिवंगत माजी राष्ट्रपती श्री.वेंकटरामन हे या संस्थचे 'मार्गदर्शक' होते. आता तो बहुमान निवृत न्यायमूर्ति श्री.चंद्रशेखर धर्माधिकारी यांना देण्याचा निर्णयही सर्वसाधारण सभेने घेतला. महाराष्ट्र सरकारच्या सहसंचालक, आरोग्य सेवा, कुष्ठरोग व क्षयरोग विभाग या पदावरुन नुकतेच निवृत्त झालेले मेजर डॉ.प्रदीप गायकवाड यांची आता इंटरनॅशनल लेप्रसी युनियनचे कार्यकारी संचालक म्हणून नेमणूक करण्यात आल्याची माहितीही प्रसिध्दी पत्रकात देण्यात आली आहे.

इंटरनॅशनल लेप्रसी युनियनच्या निवड समितीने देशभरातील कुष्ठपीडितांच्या वसाहतींमध्ये राहणा-या तसेच कुष्ठरुग्णांसाठी उल्लेखनीय सेवाकार्य करणा-या महिलांपैकी दहाजणींची निवड केली असून लवकरच या दहाजणींना विशेष पुरस्कार देऊन त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे, असेही जाहीर करण्यात आले आहे.

**(कार्यालय सचिव)करीता**

**टीप: श्री. राम नाईक व न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांची छायाचित्रे ईमेलने पाठविण्यात आली आहेत.**